महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७५६ /२०२४ — दि. ०३/०९/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कापूरबावडी** वाहतूक उप विभागाचे हद्दीत MMRDA तर्फे ॲफकॉन इन्फ्रास्ट्रक्चर लि. कंपनी कडून ब्रॉडवे पेट्रोल पंपाजवळ मेट्रो ५ साठी उभारण्यात आलेले पिलर क्र. पी–११, पी–१२ यावर स्टील गर्डर टाकतेवेळी घोडबंदर ठाणे वाहिनीवरील कापूरबावडी सर्कल मार्गे ठाणे दिशेने स्लीप रोडवरून येणारी व कोलशेत – ढोकाळी कडून कापूरबावडी सर्कलकडे येणारी व कापूरबावडी सर्कल कडून कोलशेत कडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) घोडबंदर ठाणे वाहिनी ब्रॉडवे पेट्रोल पंपासमोरील स्लीप रोडवरून कापूरबावडी सर्कल मार्गे ठाणेचे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहंनाना **आर. मॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने आर. मॉल येथून डावे वळण घेऊन मनोरमानगर येथून पुढे सरळ जावून ढोकाळी सिग्नल येथून उजवे वळण घेवून नंदीबाबा चौक येथे डावे बाजूस वळण घेऊन कापूरबावडी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कोलशेत रोडने ढोकाळी नाका कडून कापूरबावडी सर्कल मार्गे ठाणे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहंनाना **नंदिबाबा मंदिर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने नंदिबाबा मंदिर चौक येथून डावे वळण घेऊन प्रभाग समिती सिग्नल चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) कापूरबावडी सर्कल ब्रिजखालून नळपाडा मार्गे कोलशेत ढोकाळी दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कापूरबावडी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कापूरबावडी सर्कल येथून उजवीकडे वळून प्रभाग समिती सिग्नल चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

१) दि. ०३/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.३० वा. ते दि. ०४/०९/२०२४ रोजी सकाळी ०५.३० वाजेपावेतो
२) दि. ०४/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.३० वा. ते दि. ०५/०९/२०२४ रोजी सकाळी ०५.३० वाजेपावेतो
३) दि. ०५/०९/२०२४ रोजी रात्रौ २३.३० वा. ते दि. ०६/०९/२०२४ रोजी सकाळी ०५.३० वाजेपावेतो

सदर वाहतूक अधिसूचना वर नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उप विभाग
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner